# <u>सायबर क्राईम जनजागृती अभियान</u>

महाराष्ट्र शासनाच्या "**Transforming Maharashtra**" या कार्यक्रमांतर्गत **रायगड पोलीस व AXIS बँक**यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक 16.01.2018 रोजी दुपारी 03.00 वा पोलीस मुख्यालय रायगड अलिबाग येथे सायबर गुन्ह्याविषयी जनजागृती अभियान राबविण्यात आले. वाढत्या इंटरनेटच्या वापरामुळे सायबर गुन्हेगारांनी गुन्हेगारीच्या नवनवीन पद्धती शोधून लोकांचा पैसा आणि खाजगी गोपनीयता याला मोठा धोका निर्माण झाला आहे. यावेळी रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी, शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, पत्रकार बंधू-भगिनी, तसेच नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सायबर गुन्ह्यांचा धोका टाळण्याकरिता रायगड जिल्ह्यातील जनतेमध्ये जनजागृती व्हावी या करिता उपस्थिताना मागदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाकरिता रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अनिल पारस्कर, अपर पोलीस अधीक्षक श्री.संजयकुमार पाटील, श्रीम. स्मिता पाटील (प्राचार्य) पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा, पुणे, श्री अखिलेश पांडे व्हाईस प्रेसिडेंट एक्सिस बँक, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री निघोट, अलिबाग विभाग, पोलीस निरीक्षक श्री.डॉ.संजय तुंगार महिला पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा, पुणे, पोलीस निरीक्षक, श्री.नितीन गवारे प्रभारी अधिकारी सायबर क्राईम पोलीस ठाणे, रायगड, पोलीस उपनिरीक्षक श्री स्वामी तसेच सायबर सेलचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.





